श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता सप्तदशोऽध्याय मराठी



पार्थ सारथी ने समझाया धर्म-कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

विजयाचे साधन असलेल्या या श्रीमद्भागवताचे पठण करण्यापूर्वी, एखाद्याने भगवान नारायण, परम मानव नर-नारायण ऋषी, विद्येची देवी माता सरस्वती आणि लेखक श्रील व्यासदेव यांना आदरपूर्वक नमस्कार केला पाहिजे.

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

मी परमप्रभू हरि यांना आदरपूर्वक वंदन करतो, ज्यांच्या पवित्र नावांचा सामूहिक जप सर्व पापी प्रतिक्रियांचा नाश करतो आणि ज्यांच्या प्रणाम अर्पण केल्याने सर्व भौतिक दुःख दूर होतात.

### श्रीमद्भगवद्गीतायां(न्)
### सप्तदशोऽध्यायः

**अर्जुन उवाच**

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य, यजन्ते श्रद्धयान्विताः।**
**तेषां(न्) निष्ठा तु का कृष्ण, सत्त्वमाहो रजस्तमः ॥ 1॥**

अर्जुन म्हणाला ,हे कृष्णा !जी माणसे शास्त्रविधीला सोडून श्रद्धेने युक्त होऊन देवाधिकांचे पूजन करतात ,त्यांची मग स्थिती कोणती ?सात्विक ,राजस की तामस ?

**श्रीभगवानुवाच**

**त्रिविधा भवति श्रद्धा, देहिनां(म्) सा स्वभावजा।**
**सात्त्विकी राजसी चैव, तामसी चेति तां(म्) श्रृणु ॥ 2॥**

श्री भगवान म्हणाले ,मनुष्यांची ती शास्त्रीय संस्कार नसलेली ,केवळ स्वभावतः उत्पन्न झालेली श्रद्धा सात्विक ,राजस व तामस अशा तीन प्रकारचीच असते .ती तू माझ्याकडून ऐक .

सत्त्वानुरूपा सर्वस्य, श्रद्धा भवति भारत।

श्रद्धामयोऽयं(म्) पुरुषो, यो यच्छ्रद्धः(स्) स एव सः ॥ 3॥

हे भारता !सर्व माणसांची श्रद्धा त्यांच्या अंतःकरणानुरूप असते .हा पुरुष श्रद्धामय आहे .म्हणून जो पुरुष ज्या श्रद्धेने युक्त आहे ,तो स्वतःही तोच आहे. (अर्थातत्या श्रद्धेनुसार त्याचे स्वरूप असते.)

यजन्ते सात्त्विका देवान्- यक्षरक्षां(म्)सि राजसाः।

प्रेतान्भूतगणां(म्)श्चान्ये, यजन्ते तामसा जनाः ॥ 4॥

सात्विक माणसे देवांची पूजा करतात .राजस माणसे यक्ष -राक्षसांची तसेच जी इतर तामस माणसे असतात ती प्रेत व भूतगणांची पूजा करतात .

अशास्त्रविहितं(ङ्)घोरं(न्), तप्यन्ते ये तपो जनाः।

दम्भाहङ्कारसं(यँ)युक्ताः(ख्), कामरागबलान्विताः ॥ 5॥

जी माणसे शास्त्रविधी सोडून केवळ मनाच्या कल्पनेप्रमाणे घोर तप करतात तसेच ,दंभ ,अहंकार ,कामना , आसक्तीआणि बळाचा अभिमान यांनी युक्त असतात .

कर्शयन्तः(श्) शरीरस्थं(म्), भूतग्राममचेतसः।

मां(ञ्) चैवान्तः(श्)शरीरस्थं(न्), तान्विद्ध्यासुरनिश्चयान्॥ 6॥

जे शरीराच्या रूपात असलेल्या भूत समुदायाला आणि अंतकरणात राहणाऱ्या मलाही कृश करणारे असतात ,ते अज्ञानी लोक आसुरी स्वभावाचे आहेत ,असे तू जाण .

आहारस्त्वपि सर्वस्य, त्रिविधो भवति प्रियः।

यज्ञस्तपस्तथा दानं(न्), तेषां(म्) भेदमिमं(म्) श्रृणु ॥ 7॥

भोजनही सर्वांना आपापल्या प्रकृती प्रमाणे तीन प्रकारचे प्रिय असते .आणि तसेच यज्ञ ,तप आणि दानही तीन प्रकारची आहे त .त्यांचे हे निरनिराळे भेद तू माझ्याकडून ऐक .

आयुः(स्) सत्त्वबलारोग्य- सुखप्रीतिविवर्धनाः।

रस्याः(स्) स्निग्धाः(स्) स्थिरा हृद्या, आहाराः(स्) सात्त्विकप्रियाः ॥ 8॥

आयुष्य ,बुद्धी ,बळ ,आरोग्य ,सुख आणि प्रीती वाढविणारे ,रसयुक्त ,स्निग्ध ,स्थिर राहणारे ,स्वभावतः मनाला प्रिय वाटणारे असे भोजनाचे पदार्थ सात्विक पुरुषांना प्रिय असतात .

कट्वम्ललवणात्युष्ण- तीक्ष्णरूक्षविदाहिनः।

आहारा राजसस्येष्टा, दुःखशोकामयप्रदाः ॥ 9॥

कडू ,आंबट ,खारट ,फार गरम ,तिखट ,कोरडे ,जळजळणारे आणि दुःख ,काळजी व रोग उत्पन्न करणारे भोजनाचे पदार्थ राजस माणसांना आवडतात .

**यातयामं(ङ्) गतरसं(म्), पूति पर्युषितं(ञ्) च यत्।**

**उच्छिष्टमपि चामेध्यं(म्), भोजनं(न्) तामसप्रियम् ॥ 10॥**

जे भोजन कच्चे ,रसन नसलेले ,दुर्गंध येणारे ,शिळे आणि उष्टे असते तसेच जे अपवित्रही असते ,ते भोजन तामसी लोकांना आवडते .

**अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो, विधिदृष्टो य इज्यते।**

**यष्टव्यमेवेति मनः(स्), समाधाय स सात्त्विकः ॥ 11॥**

जो शास्त्रविधीने नेमून दिलेला यज्ञ करणे कर्तव्य आहे ,असे मनाचे समाधान करून फळाची इच्छा न करणाऱ्या पुरुषांकडून केला जातो ,तो सात्विक यज्ञ होय .

**अभिसन्धाय तु फलं(न्), दम्भार्थमपि चैव यत्।**

**इज्यते भरतश्रेष्ठ, तं(यँ) यज्ञं(वँ) विद्धि राजसम् ॥ 12॥**

परंतु हे अर्जुना !केवळ दिखाव यासाठी किंवा फळही नजरेसमोर ठेवून जो यज्ञ केला जातो ,तो यज्ञातून राजस समज .

**विधिहीनमसृष्टान्नं(म्), मन्त्रहीनमदक्षिणम्।**

**श्रद्धाविरहितं(यँ) यज्ञं(न्), तामसं(म्) परिचक्षते ॥ 13॥**

शास्त्राला सोडून ,अन्नदान न करता ,मंत्राशिवाय ,दक्षिणा न देता व श्रद्धा न ठेवता केल्या जाणाऱ्या यज्ञाला तामस यज्ञ म्हणतात .

**देवद्विजगुरुप्राज्ञ- पूजनं(म्) शौचमार्जवम्।**

**ब्रह्मचर्यमहिं(म्)सा च, शारीरं(न्) तप उच्यते ॥ 14॥**

देव ,ब्राह्मण ,गुरु व ज्ञानी यांची पूजा करणे ,पावित्र्य ,सरळ पणा ,ब्रह्मचर्य आणि अहिंसा हे शारीरिक तप म्हटले जाते .

**अनुद्वेगकरं(वँ) वाक्यं(म्), सत्यं(म्) प्रियहितं(ञ्) च यत्।**

**स्वाध्यायाभ्यसनं(ञ्) चैव, वाङ्मयं(न्) तप उच्यते ॥ 15॥**

जे दुसऱ्याला न बोचणारे 'प्रिय ,हितकारक आणि यथार्थ भाषण असते ते ,तसेच वेदशास्त्रांचे पठण आणि परमेश्वराच्या नामजपाचा अभ्यास हेच वाणीचे तप म्हटले जाते .

**मनः(फ्) प्रसादः(स्) सौम्यत्वं(म्), मौनमात्मविनिग्रहः।**

**भावसं(म्)शुद्धिरित्येतत्- तपो मानसमुच्यते ॥ 16॥**

मनाची प्रसन्नता ,शांत भाव ,भगवत चिंतन करण्याचा स्वभाव ,मनाचा निग्रह आणि अंतःकरणातील भावांची पूर्ण पवित्रता हे मनाचे तप म्हटले जाते .

**श्रद्धया परया तप्तं(न्), तपस्तत्त्रिविधं(न्) नरैः।**

**अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः(स्), सात्त्विकं(म्) परिचक्षते ॥ 17॥**

फळाची इच्छा न करणाऱ्या योगी पुरुषांकडून अत्यंत श्रद्धेने केलेल्या वर सांगितलेल्या तिन्ही प्रकारच्या तपाला सात्विक तप म्हणतात .

**सत्कारमानपूजार्थं(न्), तपो दम्भेन चैव यत्।**

**क्रियते तदिह प्रोक्तं(म्), राजसं(ञ्) चलमध्रुवम् ॥ 18॥**

जे तप सत्कार ,मान व पूजा होण्यासाठी तसेच दुसऱ्या काही स्वार्थासाठी ही स्वभावाप्रमाणे किंवा पाखंडी पणाने केले जाते ,ते अनिश्चित तसेच क्षणिक फळ देणारे तप येथे राजस म्हटले आहे .

**मूढग्राहेणात्मनो यत्-पीडया क्रियते तपः।**

**परस्योत्सादनार्थं(वँ) वा, तत्तामसमुदाहृतम् ॥ 19॥**

जे तप मूर्खतापूर्वक हट्टाने ,मन ,वाणी आणि शरीराला कष्ट देऊन किंवा दुसऱ्यांचे अनिष्ट करण्यासाठी केले जाते ,ते तपता मस म्हटले गेले आहे .

**दातव्यमिति यद्दानं(न्), दीयतेऽनुपकारिणे।**

**देशे काले च पात्रे च, तद्दानं(म्) सात्त्विकं(म्) स्मृतम् ॥ 20॥**

'दान देणेच कर्तव्य आहे ' 'या भावनेने जे दान देश ,काल आणि पात्र मिळाली असता उपकार न करणाऱ्याला दिले जाते ,ते दान सात्विक म्हटले गेले आहे .

**यत्तु प्रत्युपकारार्थं(म्), फलमुद्दिश्य वा पुनः।**

**दीयते च परिक्लिष्टं(न्), तद्दानं(म्) राजसं(म्) स्मृतम् ॥ 21॥**

परंतु जे दान क्लेश पूर्वक प्रत्युपकाराच्या हेतूने किंवा फळ नजरेसमोर ठेवून दिले जाते ,ते राजस दान म्हटले आहे .

**अदेशकाले यद्दान- मपात्रेभ्यश्च दीयते।**

**असत्कृतमवज्ञातं(न्), तत्तामसमुदाहृतम् ॥ 22॥**

जे दान सत्काराशिवाय किंवा तिरस्कार पूर्वक अयोग्य ठिकाणी ,अयोग्य काळी आणि कुपात्री दिले जाते ,ते दान तामस म्हटले गेले आहे .

**ॐ तत्सदिति निर्देशो, ब्रह्मणस्त्रिविधः(स्) स्मृतः।**

**ब्राह्मणास्तेन वेदाश्च, यज्ञाश्च विहिताः(फ्) पुरा ॥ 23॥**

ॐ ,तत् ' सत्अशी तीन प्रकारची सच्चिदानंद घन ब्रह्माची नावे सांगितली आहेत .त्यांपासून सृष्टीच्या आरंभी ब्राह्मण 'वेद आणि यज्ञादिस रचले  गेले आहेत .

तस्मादोमित्युदाहृत्य, यज्ञदानतपः(ख्)क्रियाः।

प्रवर्तन्ते विधानोक्ताः(स्), सततं(म्) ब्रह्मवादिनाम् ॥ 24॥

म्हणून वेदमंत्रांचा उच्चार करणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांच्या शास्त्राने सांगितलेल्या यज्ञ ,दान व तपरूप क्रियांचा नेहमी ॐया परमात्म्याच्या नावाचा उच्चार करूनच आरंभ होत असतो .

तदित्यनभिसन्धाय, फलं(यँ) यज्ञतपः(ख्) क्रियाः।

दानक्रियाश्च विविधाः(ख्), क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ॥ 25॥

' तत् ' या नावाने संबोधल्या जाणाऱ्या परमात्म्याचे हे सर्व आहे .या भावनेने फळाची इच्छा न करता नाना प्रकारच्या यज्ञ तप व दान रूप क्रिया कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषांकडून केल्या जातात .

सद्भावे साधुभावे च, सदित्येतत्प्रयुज्यते।

प्रशस्ते कर्मणि तथा, सच्छब्दः(फ्) पार्थ युज्यते ॥ 26॥

' सत् 'या परमात्म्याच्या नावाचा सत्य भावात आणि श्रेष्ठ भावातप्रयोग केला जातो .तसेच हे पार्था !उत्तम कर्मातही ' सत् 'शब्दयोज ला जातो .

यज्ञे तपसि दाने च, स्थितिः(स्) सदिति चोच्यते।

कर्म चैव तदर्थीयं(म्), सदित्येवाभिधीयते ॥ 27॥

तसेच यज्ञ तप व दान यांमध्ये जी स्थिती (आस्तिकबुद्धी)असते ,तिलाही सत्असे म्हणतात आणि त्या परमात्म्यासाठी केलेले कर्म निश्चयाने ' सत् 'असे म्हटले जाते .

अश्रद्धया हुतं(न्) दत्तं(न्), तपस्तप्तं(ङ्) कृतं(ञ्) च यत्।

असदित्युच्यते पार्थ, न च तत्प्रेत्य नो इह ॥ 28॥

हे अर्जुना !श्रद्धे शिवाय केलेले हवन ,दिलेले दान 'केलेले तप आणि जे काही केलेले शुभकार्य असेल ,ते सर्व ' असत् 'म्हटले जाते . त्यामुळे ते ना इहलोकात फलदायी होते ना परलोकात .

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि

श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे

श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥

**"तो (परब्रह्म) पूर्ण आहे, हे (सृष्टी) देखील पूर्ण आहे; पूर्णामधून पूर्ण निर्माण होते, आणि पूर्ण घेऊन (निर्मितीनंतरही) पूर्णच उरते."**